(९३)


| | महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग<br>राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,<br>डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे - ४११ ००१ | |
|---|---|---|
| उपसंचालक आरोग्य सेवा<br>(आमाजिआ)<br>तथा उपमुख्य निबंधक<br>(जन्म व मृत्य) महाराष्ट्र राज्य | | कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०<br>कायदा विभाग ☎ :- ०२० - २६०५८२९२<br>फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२<br>ई-मेल crs_d83@yahoo.com |
| आरोग्य सेवा<br>परिपत्रक | | जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८३/आधार कार्ड/१४६५३-/१७<br>दिनांक:- ०२/१२/२०१७ |


प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक, जन्म-मृत्यू,
जिल्हा परिषद, ......... (सर्व)

२) आरोग्याधिकारीतथा निबंधक, जन्म-मृत्यू,
महानगरपालिका, ........ (सर्व)

३) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक, जन्म-मृत्यू,
बृहन्मुंबई महानगरपालिका,एफ साऊथ वार्डस, परळ, मुंबई.

विषय - <u>मृत्यू नोंदणीसाठी आधारकार्ड ऐच्छिक असल्याबाबत.</u>

संदर्भ - १) मा. महानिबंधक जन्म-मृत्यू नोंदणी केंद्रिय गृह मंत्रालय यांची अधिसूचना क्रं. १/१२/२०१४/व्हीएस-सीआरएस, नवी-दिल्ली, दि.०८/०८/२०१७.

२) मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु, मुंबई यांची मान्य टिपणी दिनांक १९/०८/२०१७.

३) मा. महानिबंधक जन्म-मृत्यू नोंदणी केंद्रिय गृह मंत्रालय यांची स्पष्टीकरण क्रं. १/१२/२०१४/व्हीएस-सीआरएस, नवी-दिल्ली, दि.०८/०९/२०१७

उपरोक्त विषयाबाबत मृत्यु नोंदीसाठी आधार कार्ड आवश्यक असल्याबाबत संदर्भ क्र १ अन्वये या कार्यालयास कळविण्यात आले होते.त्यानुसार संदर्भ क्रं.२ अन्वये आपणास याबाबत अवगत करण्यात आले आहे.

परंतु संदर्भ क्रं.३ अन्वये मा.महानिबंधक जन्म-मृत्यू नोंदणी केंद्रिय गृह मंत्रालय यांची CLARIFICATION/INTERPRETATIONक्रं. १/१२/२०१४/व्हीएस-सीआरएस,नवी-दिल्ली,दि.८/०९/१७ मृत्यु घटनांच्या नोंदणीकरीता आधार नोंदणी ऐच्छिक करण्याबाबत कळविलेले आहे.(सदर अधिसुचना सोबत सादर) त्यानुसार आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व संबधित निबंधक कार्यालयांना कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल या कार्यालयास देण्यात यावा.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ करिता

प्रत सविनय सादर - १) मा.प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय, संकुल इमारत, १० वा मजला, मुंबई-४०० ००१.

२) मा.आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

३) मा.संचालक,आरोग्य सेवा,तथा मुख्य निंबधक महाराष्ट्र राज्य,मुंबई

४) मा.उपसंचालक आरोग्य सेवा, ....... मंडळ, ....... (सर्व)

प्रत - The Registrar General of India, Government of India, Ministry of Home Affairs.

95

Speed Post

NO 1/12/ 2014 VS (CRS)

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
गृह मंत्रालय
MINISTRY OF HOME AFFAIRS
भारत के महारजिस्ट्रार का कार्यालय
OFFICE OF THE REGISTRAR GENERAL, INDIA
जीवनांक प्रभाग, पश्चिमी खण्ड-1, रामकृष्ण पुरम्, नई दिल्ली - 110066
V.S. Division, West Block –I, R.K. Puram, New De Tele-fax.No 26100678
E mail –drg.crs.rgi@nic.in sandhya.singh@nic.in djam.rgi@nic.in

Dated 05 08 2017

## CLARIFICATION / INTERPRETATION

Subject - Requirement of Aadhaar number for Registration of Death of an Individual-regarding

This has reference to this office Notification No. 1/12/2014-VS-CRS dated 04-08-2017 on the above subject which was written to the State Government/UT Administration providing for the use of Aadhaar number in the registration of death w.e.f 1st October, 2017.

2. In view of the feedbacks received from various quarters and to avoid any inconvenience to the general public, it is to state that the interpretation of the above said notification may be considered as follows:-

*"The notification prescribes that the applicant may provide Aadhaar number or Enrolment ID number of the deceased,* ***if available,*** *and other details as sought in the application for the Death registration/certificate.* ***In case Aadhaar number*** *of the deceased is not available, it will be sufficient to get a declaration to that effect from the applicant. Similarly, the applicant may also provide his own Aadhaar number and Aadhaar numbers of spouse and parents if they are* ***available,*** *for establishing their identities. The requirement of Aadhaar number, therefore, is* ***not mandatory"***

3. Taken into consideration the above interpretation in respect of the said Notification dated 04-08-2017, **you are requested** to issue necessary instructions/clarification to the concerned **Departments accordingly with a copy** of the same to this office.

4. This issues with the approval of the competent authority.

Yours faithfully

(Anil Sant)

Joint Secretary and Additional Registrar General of India

To
The Chief Secretaries/Administrators of all States/UT

प्रत्येक जन्म एवम् मृत्यु का पंजीकरण सुनिश्चित करें
"Ensure Registration of Every Birth and Death"

(11)

| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | **आरोग्य सेवा संचालनालय**<br>(महाराष्ट्र राज्य)<br>"आरोग्य भवन" सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,<br>पी.डिमेलो रोड मुंबई - ४०० ००१ | |


दूरध्वनी

कार्यालय (०२२)२२६२१०३१-३६
संचालक (वैयक्तिक) (०२२)२२६२१००६

Website : http://arogya.maharashtra..gov.in
Email : dhs_2005@rediffmail.com
Email: miscell@rediffmail.com
Phone : MIS Cell (022) 22621034
DHS Cell : 22620234


क्र.संआसे/जन्म-मृत्यु/कक्ष-१८/अधिसूचना/5636-5720/१८
दिनांक :- 1-6-2018.

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु
जिल्हा परिषद ........... (सर्व)

२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु
महानगरपालिका ............ (सर्व)

३) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु,
वृहन्मुंबई महानगरपालिका, परेल, मुंबई.

४) कार्यकारी अधिकारी तथा निबंधक, जन्म-मृत्यु,
कॅन्टोनमेंट बोर्ड............ (सर्व)

विषय :- राज्यातील शासकीय आरोग्य संस्थामध्ये संस्था प्रमुखांना निबंधक, जन्म-मृत्यू नियुक्त करणेबाबत अधिसूचना.

संदर्भ :- १) भारत सरकारचे उपमहानिबंधक, नवी-दिल्ली यांचे पत्र क्रं. No.2/20/2014-VS-CRS/Vol.II/127, dated 7th July 2015.

२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २६/११/२०१५ रोजी झालेल्या आंतर विभागीय समन्वय समिती मधील निर्णय.

३) महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-ब, गुरुवार ते बुधवार, एप्रिल १९-२५, २०१८/चैत्र २९, वैशाख ५, शके १९४०, दिनांक १२ एप्रिल २०१८.

उपरोक्त विषयाबाबत मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्यनिबंधक, जन्म-मृत्यू, महारा. शासन, मुंबई यांचे दिनांक १०/०६/२०११ च्या आदेशान्वये निवडक शासकीय आरोग्य संस्था मध्ये होणा-या जन्म घटनांची नोंद करुन रुग्णालय सोडण्यापूर्वी संबंधितांना जन्म प्रमाणपत्र वितरीत करण्यासाठी उपनिबंधक (जन्म) अशी नियुक्ती करण्यात आली होती.

मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार (दिनांक २०/०९/२०१०) व संदर्भ क्रं.१ अन्वये केंद्र शासनाने राज्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थाचे जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये स्त्री रुग्णालये, ग्रामिण रुग्णालये, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, प्राथमिक आरोग्य केंद्र या आरोग्य

संस्थेतील संस्था प्रमुखांना शासनाने प्रकरण या जन्म व मृत्यु घटनेच्या नोंदणीसाठी निबंधक जन्म मृत्यु नियुक्ती करणेबाबत आदेशित केले आहे.

वास्तव केंद्र शासनाच्या मान्यतेने यापूर्वी निर्गमित केलेल्या सर्व अधिसूचना/आदेश यांना अधिक्रमित करुन जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम ७(१) अन्वये मह... शासनाने सोबतच्या सुधारित अनुसूचीप्रमाणे "निबंधक जन्म मृत्यु" म्हणून नेमणूक केली आहे. या संदर्भातील अधिसूचना दिनांक १४ एप्रिल २०१८ रोजी निर्गमित केलेली आहे. सदर अधिसूचनेची प्रत आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबतच्या जोडण्यात येत आहे. नवनियुक्त निबंधक, जन्म मृत्यू यांना नागरी नोंदणी पध्दती बाबत प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षण झाल्यावर संबंधित निबंधक जन्म मृत्यू यांनी जन्म मृत्यु नोंदणीचे काम सुरु करुन संबंधितांना जन्म मृत्यु प्रमाणपत्र अदा करावे. सदर अधिसूचनेबाबत आपल्या अधिनस्त असणारे निबंधक जन्म मृत्यु ग्रामिण व शहरी भाग यांना अवगत करावे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास व उपसंचालक आरोग्य सेवा तथा उपमुख्यनिबंधक, जन्म मृत्यू (आमाजीआ) पुणे ६ या कार्यालयास सादर करावा.

संचालक, आरोग्य सेवा
तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, मुंबई १

प्रत माहितीस्तव सादर :-
१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मा. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) मा. आयुक्त, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) मा. उपमहानिबंधक, जनगणना कार्यालय, मुंबई.

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी :-
१) उपसंचालक आरोग्य सेवा तथा उपमुख्यनिबंधक, जन्म मृत्यु, (आमाजीआ) पुणे १
२) उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे ............ (सर्व)

उपसंचालक
आरोग्य सेवा (आ मा जी आ)
पुणे
आवक क्र.

CID-83/Circular 2015.in

सार्वजनिक आरोग्य विभाग

जी. टी. रुग्णालय आवार, १० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक १२ एप्रिल २०१८

अधिसूचना

जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९.

क्रमांक जमृनो. २०१६/प्र.क्र. ३१७/कु.क.—केंद्र शासनाचा जन्म आणि मृत्यू अधिनियम, १९६९ (१९६९ चा १८)-मधील कलम ७(१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि त्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या इतर सहाय्यभूत अधिकारांचा वापर करून या अधिनियमा प्रयोजनार्थ निबंधकांच्या नियुक्ती संदर्भातील निर्गमित सर्व अधिसूचना आदेश वा अन्य दस्तऐवज या ऐवजी शासन सोबतच्या अनुसूचीतील स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिकारी यांना सदर अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्टीत स्थानिक क्षेत्राकरिता " निबंधक जन्म व मृत्यू " म्हणून नेमणूक करीत आहे.

अनुसूची

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे पदनाम | स्थानिक क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | " अधिष्ठाता " शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व) | शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे रुग्णालय इमारतीत व रुग्णालयीन परिसर क्षेत्रात घडणाऱ्या घटनांसाठी |
| २ | " जिल्हा शल्य चिकित्सक " जिल्हा रुग्णालय (सर्व) | जिल्हा रुग्णालय इमारत व रुग्णालयीन परिसरातील क्षेत्रात घडणाऱ्या घटनांसाठी |
| ३ | " जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकिय अधीक्षक " सामान्य रुग्णालय (सर्व). | सामान्य रुग्णालय इमारत व रुग्णालयीन परिसरातील क्षेत्रात घडणाऱ्या घटनांसाठी |
| ४ | " वैद्यकिय अधीक्षक " उप जिल्हा रुग्णालय (सर्व) | उप जिल्हा रुग्णालय इमारत व रुग्णालयीन परिसरातील क्षेत्रात घडणाऱ्या घटनांसाठी |
| ५ | " वैद्यकिय अधीक्षक " ग्रामिण रुग्णालय (सर्व) | ग्रामिण रुग्णालय इमारत व रुग्णालयीन परिसरातील क्षेत्रात घडणाऱ्या घटनांसाठी |
| ६ | " वैद्यकिय अधीक्षक " स्त्री रुग्णालय (सर्व) | स्त्री रुग्णालय इमारत व रुग्णालयीन परिसरातील क्षेत्रात घडणाऱ्या घटनांसाठी |
| ७ | " वैद्यकिय अधिकारी " प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व) | प्राथमिक आरोग्य केंद्र, इमारत व रुग्णालयीन परिसरातील क्षेत्रात घडणाऱ्या घटनांसाठी. |
| ८ | " कार्यकारी आरोग्य अधिकारी " | उपरोक्त अ. क्र. १ आणि २ नोंदीतील क्षेत्र वगळून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र |
| ९ | " आरोग्य अधिकारी " महानगरपालिका (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून सर्व). | अ. क्र. १ ते ७ नोंदीतील विनिर्दिष्ट स्थानिक क्षेत्र वगळून महानगरपालिका क्षेत्र |
| १० | " मुख्याधिकारी " नगर परिषद/नगर पंचायत (सर्व) | उक्त अ. क्र. १ ते ७ नोंदीमधील स्थानिक क्षेत्र वगळून संबंधित नगरपरिषद किंवा नगरपंचायत क्षेत्र. |
| ११ | " कार्यकारी अधिकारी " कॅन्टोन्मेन्ट बोर्ड (सर्व) | कॅन्टोन्मेन्ट बोर्ड क्षेत्र |
| १२ | " व्यवस्थापक/प्रशासक/संस्थाप्रमुख " ऑर्डिनन्स कारखाने (सर्व). | ऑर्डिनन्स कारखाना क्षेत्र |
| १३ | " ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी " | उक्त अ. क्र. ५ व ७ नोंदीमधील स्थानिक क्षेत्र वगळून संबंधित खेड्याचे क्षेत्र |
| १४ | उक्त अ.क्र. १ ते १३ नोंदीमधील विनिर्दिष्टीत क्षेत्राचे प्रशासक वगळून " विनिर्दिष्टीत क्षेत्राचे प्रशासक ". | संबंधित प्रशासकाच्या अधिपत्याखालील विनिर्दिष्टीत क्षेत्र |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व. मु. भरोसे,
शासनाचे उप सचिव.

आरोग्य सेवा (आ.मा.नी.आ.)
21 MAY 2018